Annexure XVI(9),(Vide Article-16.05)

गोपनीय

प्र. मु. व. सं. महा. राज्य
नागपूर-४४० ००६.
Dt. - 2 MAR 2007
आवक क्रमांक 5584
कक्ष क्रमांक 9

संशयास्पद सचोटी असलेल्या अधिकाऱ्यांची यादी बनविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक सीडीआर-१००५/प्र.क्र.१/०५/११
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३० ऑक्टोबर, २००६

संदर्भ :- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-२०७२/६८६/डी-१, दि.१४ मार्च, १९७२,
(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-२०७७/८०७/३७/११, दि.१८ मार्च, १९७७,
(३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-२०७७/८०७/३७/११, दि.१५ फेब्रुवारी, १९७८,

## परिपत्रक

शासनाच्या सर्व विभागप्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त कार्यरत असलेल्या राजपत्रित अधिकाऱ्यांच्या सचोटीची खात्री करुन घेऊन ज्यांची सचोटी संशयास्पद आहे; अशा अधिकाऱ्यांची यादी शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.सीडीआर-२०७२/६८६/डी-१, दि.१४ मार्च, १९७२ मधील विहित कार्यपद्धतीनुसार करावी, अशा सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच, सदर अधिकाऱ्यांवर नजर ठेवावी व ज्यांनी अशा प्रकारे कार्यवाही केली नसेल तर त्यांना जबाबदार धरण्यात यावे, अशा सूचना शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-२०७७/८०७/३७/११, दि.१८ मार्च, १९७७ व दि.१५ फेब्रुवारी, १९७८ नुसार निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जात नाही, असे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

२. शासकीय कार्यालयामधील भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यांसदर्भातील शासनाच्या सध्याच्या सर्वसाधारण धोरणांचा विचार करता, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-२०७२/६८६/डी-१, दि.१४ मार्च, १९७२ मध्ये नमूद केलेल्या सूचना पुन्हा सर्व विभागप्रमुखांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार शासकीय सेवकाची संशयास्पद सचोटी ठरविण्यासाठी पुढीलप्रमाणे निकष विचारात घेऊन विभाग प्रमुखांनी यादी तयार करावी :-

(अ) ज्या अधिकाऱ्यांविरुद्ध सापळाप्रकरणी कारवाई झाली आहे,

(ब) अपसंपदेप्रकरणी ज्या अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल झालाआहे,

(क) ज्या अधिकाऱ्यांचे चारित्र्य संशयास्पद आहे, असे विभागप्रमुखांच्या लक्षात आले आहे व याबाबतीत सदर अधिकाऱ्याचे चारित्र्य संशयास्पद आहे हे स्पष्ट करणाऱ्या ठोस घटना/वर्तन उपलब्ध आहेत. अशा अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालामध्ये त्या अधिकाऱ्यांची सचोटी संशयास्पद असे नमूद करण्यात यावे व त्यासाठी ठोस कारणमीमांसा देण्यात यावी. तसेच, या अधिकाऱ्यांची नावे संशयास्पद सचोटीच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात यावीत.

३. विभागप्रमुखांनी वरीलप्रमाणे यादी तयार केल्यानंतर ती ॲन्टी करप्शन ब्युरोस पाठवावी. ॲन्टी करप्शन ब्युरो आवश्यकतेनुसार या अधिकाऱ्यांबाबत गुप्त चौकशी करुन त्यांचा अहवाल संबंधित प्रशासकीय विभागास सादर करतील. संबंधित प्रशासकीय विभागाने ही यादी अंतिम करुन त्यास शासनाची मान्यता प्राप्त करुन घ्यावी. अशा प्रकारे विभागप्रमुख, संबंधित प्रशासकीय विभाग व ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्या सहमतीने ही यादी तयार करावी. तयार करण्यात आलेली अशी यादी तीन वर्षाकरिता प्रभावी राहील व दरवर्षी जुलै महिन्यामध्ये या यादीचे पुर्नविलोकन करण्यात येईल.

४. सदर यादीचा वापर पदोन्नती, महत्त्वाच्या पदांवर नियुक्ती, पारपत्र देणे, केंद्रीय नियुक्ती, परदेश प्रशिक्षण, विविध प्रकारचे मेडल्स व गौरव पुरस्कार देताना करण्यात यावा.

५. सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील विभागप्रमुखांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भि. रा. वाढवे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मुख्य सचिव/सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*आयुक्त राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.

-------

* पत्राने

३/C/C.R.No.१.०५ letter/३०१००६

------